# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ०५/०६/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

देशभरात दिनांक ५ जुन हा दिवस दरवर्षी जागतिक पर्यावरण दिन मळणून साजरा केला जातो. देशभरात मोठया प्रमाणात होत असलेली वृक्षतोड, विजेचा अमाप वापर, पाण्याचा अपव्यय, आधुनिकीकरणामुळे मानवाने अंगिकारलेल्या अवाजवी सवयी यामुळे पर्यावरणाचा –हास होत चालला आहे. दिवसेंदिवस वातावरणात होत असलेला बदल, विजेचा भासत असलेला तुटवडा, इंधनाची टचाई यामुळे भविष्यात मानवाला मोठया संकटाला सामोरे जावे लागत आहे. पर्यावरणाचा होत असलेला –हास थांबविण्यासाठी तसेच नागरीकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्यादृष्टीने विविध उपाययोजनांद्वारे जनजागृती होणे आवश्यक आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय यांनीदेखील जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने व्यापक जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत सुचित केले आहे. त्यानुसार मा. आयुक्त, अजिज शेख, अति. आयुक्त, करुणा जुईकर, अति. आयुक्त, जमीर लेंगरेकर तसेच उपायुक्त (पर्यावरण), डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ५ जुन, २०२३ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पर्यावरण विभागप्रमुख, सौ. विशाखा सावंत व उद्यान अधिक्षक, श्रीम. दिप्ती पवार यांचेमार्फत विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महापालिका मुख्यालयामध्ये कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी तसेच उपस्थित नागरीक यांच्यासमवेत हरित शपथ घेण्यात आली. उल्हासनगर-४ येथील एस.एस.टी. महाविद्यालयातील एनएसएस चे विद्यार्थी यांच्यामार्फत प्लास्टीकचा वापर करू नका हा संदेश देणारे पथनाटय सादर करण्यात आले.

महापालिकेमधील प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने एक झाड लावावे व त्याचे संगोपन करावे ही संकल्पना राबवित आज महापालिकेतील अति. आयुक्त, उपायुक्त तसेच विभागप्रमुख यांनी महापालिका मुख्यालयातील मागील परिसरात वड, पिंपळ, अशोक, कडुलिंब अशा विविध प्रकारची झाडे लावुन वृक्षारोपण केले.

महापालिकेच्या उद्यान विभागामार्फत इंदिरा गांधी उद्यान, उल्हासनगर-३ येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या रोपवाटीकेचे उदघाटन अति. आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्याहस्ते करण्यात आले. त्यानंतर उद्यान विभागामार्फत उल्हासनगर शहरातील नागरीकांकरीता आयोजित माझी बाग माझा परिसर ही स्पर्धा आयोजित केली होती. सदर स्पर्धा प्रथमच राबविण्यात आली होती त्याद्वारे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी विजेत्या ठरलेल्या स्पर्धकांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले. त्यानंतर पर्यावरण विभागामार्फत पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश देण्याकरीता महापालिका मुख्यालयातुन वृक्षदिंडी काढून कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील दुभाजकांवर वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये उल्हासनगर शहरातील अशासकिय संस्थांच्या मोठया संख्येने महिला व महापालिकेतील सर्व अधिकारी/कर्मचारीदेखील सहभागी झाले होते.

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये उपायुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे, मुख्य लेखा अधिकारी, श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा परिक्षक, श्री. शरद देशमुख, वैद्यकिय आरोगय अधिकारी श्रीम. अनिता सपकाळे, सहा. सार्व. अरोग्य अधिकारी, मनिष हिवरे, श्री. विनोद केणी, श्री. एकनाथ पवार, श्री. राजा बुलानी, श्री. राजेश धनघाव, श्री. अंकुश कदम, श्रीम. छाया डांगळे, श्रीम. श्रध्दा सपकाळे, श्री. शांताराम चौधरी इत्यादी महापालिकेचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. अशाप्रकारे उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे दिवसभर विविध जनजागृतीपर कार्यक्रमाद्वारे जास्तीत जास्त लोकसहभागाने व्यापक स्वरुपात जागतिक पर्यावरण दिन साजरा करत पर्यावरणाविषयी जनजागृती करण्यात आली.

5/6/23

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत –माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम् ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.